नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 20/07/2020 (सोमवार)
(दुपार)

---

## दुखापत

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 3 कि. मी. अंतरावरील वार्ड क्र. 2, मौजा दत्तनगर, चनकापुर येथे दिनांक 19/07/2020 चे 08.00 वा. ते 08.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– बबीता निलमचंद्र बंदेवार, वय 29 वर्ष, रा. वार्ड क्र. 02 चनकापुर व आरोपी नामे– 1) श्रीचंद वर्मा हे ऐकमेकाचे शेजारी राहत असुन फिर्यादी हे त्यांचे नविन बनवीलेले कंपाउंड वॉलवर पानी टाकत असता आरोपी क्र. 1. व 2) यशोदा वर्मा, दोन्ही रा. दत्तनगर वार्ड क्र. 2, चनकापुर यांनी संगनमत करून फिर्यादींना म्हटले की, ''माझ्या घराकडे किचड नको करू'' असे म्हणुन शिवीगाळ केली. फिर्यादीने आरोपीला शिवीगाळ करण्यास हटकले असता आरोपी क्र. 01 याने त्याचे हातातील कोणतेतरी धारदार लोखंडी वस्तु फिर्यादीचे कपाळावर फेकुन मारले. फिर्यादीने आपल्या डाव्या हातांनी अडवीले असता ती धारदार वस्तु फिर्यादीचे डाव्या हाताला लागुन फिर्यादी या जखमी झाल्या.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक सुरेंद्र वासनिक हे करीत आहे.

2) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 16 कि. मी. अंतरावर मौजा घोगरा शिवार मनाथेश्वर मंदीराचे पायथ्याशी दिनांक 19/07/2020 चे 11.40 वा. ते 12.15 वा. दरम्यान फिर्यादी नामे– नंदु उत्तमराव पेठे, वय 44 वर्ष, रा. घोगरा ता. नरखेड हे मयतीकरीता गेले होते. फिर्यादी हे परत येत असतांना आरोपी नामे क्र. 1) अक्षय भाऊराव कोकाटे, वय 25 वर्ष, 2) भाऊराव काशीनाथ कोकाटे, वय 52 वर्ष, दोन्ही रा. घोगरा व 3) आकाक्ष श्रावणजी उईके, वय 23 वर्ष, रा. आनंदवाडी ता. आष्टी, जि. वर्धा यांनी संगनमत करुन फिर्यादीस म्हटले की, ''तुम्ही मला एक लाख रुपये दिले असे गावात सांगितले'' या कारणावरुन आरोपीतांनी फिर्यादीला पाठीमागून पकडून ओढतान केली व अंगातील कपडे फाडून शिवीगाळ केली तसेच आरोपी क्र. 01 याने त्याचे हातातील लाकडी उभारीने डोक्याचे उजवे भागावर मारुन जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक प्रजोक तायडे 8308964714 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर